# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक ०९.१०.२०२६ शुक्रवार**

**१) मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते उत्कृष्ट तपास करणारे अधिकारी व अंमलदार यांचा गौरव :—**

मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी पोलीस आयुक्तालय अंतर्गत येणारे पोलीस ठाणे नवीन कामठी, खापरखेडा, कपिलनगर, सिताबर्डी, पाचपावली, गुन्हेशाखा युनिट क्र. ३ व वाहतुक शाखा व परिमंडळ क्र. ६ येथील उत्कृष्ट काम करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा आज दिनांक ०९. १०.२०२६ रोजी पोलीस भवन येथील कॉन्फरन्स हॉल येथे प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव केला.

ज्यामध्ये, पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीतील नेरी उनगाव रोड जवळील शेतशिवारात झाडाझुडपात दरोडयाचे तयारी असलेल्या आरोपींना गोपनिय माहितीच्या आधारे ताब्यात घेऊन संभाव्य दरोडयाचा प्रकार टाळल्याबाबत पोलीस ठाणे नवीन कामठी येथील वपोनि श्री महेश आंधळे, पोहवा अनुप आढाव, पोअं. धर्मपाल सहारे, आकाश मनवर, सुरज आंबुलकर यांचा, तसेच पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीतील जिवघेण्या हल्ल्याचे घटनेत तत्परतेने कार्यवाही करुन आरोपीस ताब्यात घेऊन जखमी व्यक्तीचे प्राण वाचविलेबाबत पोलीस ठाणे खापरखेडा येथील वपोनि संदीप बुआ, पोहवा आलोक रावत, नापोअं शोयेब शेख, प्रितम ठाकुर यांचा समावेश आहे.

तसेच पोलीस ठाणे कपिलनगर येथे दाखल अप.क्र. १३५/२०२१ कलम ३०२ भादंविचे गुन्हयात उत्कृष्ट तपास करुन तसेच न्यायालयीन प्रक्रियेत योग्य समन्वय राखल्याने गुन्हयात दोषसिध्दी मिळाल्याने तपासी अधिकारी पोउपनि रणजीत रणनवरे, कोर्ट पैरवी अंमलदार मपोहवा प्रेरणा अंबादे व पोअं. देवानंद थोरात यांचाही समावेश आहे. तसेच गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी पोलीस ठाणे तहसील हद्दीतील धारस्कर रोडवरील चहाचे टपरीत मिळुन आलेल्या अनोळखी मृतकाची ओळख पटवुन, गुन्हयाचा तत्पर तांत्रिक तपास करुन अवघ्या चार चासात तीन आरोपींना अटक करुन गुन्हा उघडकीस आणल्याने गुन्हेशाखा युनिट के. ३ चे पोनि श्री अतुल मोहनकर, पोउपनि मधुकर काठोके, सायबर सेलचे पोउपनि विवेक झिंगरे, सफौ. संतोष ठाकुर, अजय पाटील, पोअं. दीपक दासवार व पोअं. विवेक भोयर यांचा,

दिनांक २४.०८.२०२६ रोजी पोलीस ठाणे मानकापुर येथील जलशुध्दीकरण केंद्रात झालेल्या क्लोरीन गॅस गळतीचे आपत्कालीन घटनेचे गांभिर्य लक्षात घेऊन, मा. श्री. आदित्य मिरखेलकर, पोलीस उपायुक्त वाहतुक शाखा यांनी त्वरीत घटनास्थळी पोहोचुन, परिसरातील शेकडो नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविले व घटनास्थळ परिसर सील करून, इतर संबंधीत विभांगाशी समन्वय साधुन, वायु गळती आटोक्यात आणुन, बंद करण्यास सहकार्य केल्याने मा. श्री. आदित्य मिरखेलकर, पोलीस उपायुक्त वाहतुक शाखा यांचा,

तसेच, पोलीस पोलीस ठाणे नवीन कामठी येथे कार्यरत बिट मार्शल यांनी प्राप्त सुचनेवरुन त्वरीत घटनास्थळी जाऊन, प्रसंगावधान राखुन आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या मानसिकदृष्टया अस्थिर असलेल्या इसमास परावृत्त करुन त्याचे प्राण वाचविणारे पोहवा भास्कर पांडे व पोअं. मिथुन शेरे यांचा,

तसेच पोलीस ठाणे पाचपावली येथे दाखल घरफोडीचे गुन्हयात तांत्रिक तपास करुन, आरोपी निष्पन्न करुन, त्याचेकडुन ६३,९९,४२०/— रु. चा मुद्येमाल हस्तगत करणारे तपासी अंमलदार पोहवा वासुदेव जयपुरकर यांचा, तसेच दिनांक ३०.०९.२०२६ रोजी शासकीय वाहनाने कर्तव्यावर जात असतांना कोराडी हद्यीत संशयीतरित्या भरधाव वेगाने जाणारे दोन इसमांना ताब्यात घेऊन मानकापुर पोलीसांचे ताब्यात दिले. सदर इसम हे पोलीस ठाणे मानकापुर येथील जबरी चोरीचे गुन्हयातील पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. सदर उत्कृष्ट कामगिरीबाबत मा. पोलीस उपायुक्त, परि.क्र. ६ श्री रमेश धुमाळ व त्याचे वाहनावरील चालक व आरटीपीसी पोअं. अतुल गिधाने व उपेंद्र निरगुळकर यांचा,

गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकातील वाहन चालक यांनी माहे संप्टेंबर २०२६ मध्ये चोरीच्या वाहनांचे पार्टस् वेगळे करुन त्यांची विल्हेवाट लावणाऱ्या व दहशत माजविण्यासाठी अग्निशस्त्र बाळगणाऱ्या परप्रातीय आरोपीस अटक करुन त्याचेकडून ०२ गुन्हे उघडकीस आणणारे पोअं. राहुल पाटील यांचा,

वरील सर्व उत्कृष्ठ कामगिरी बजावणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना बक्षिसे व प्रशस्तीपत्रे देऊन, त्यांचा सत्कार करुन, त्यांनी भविष्यात अशाच प्रकारे उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी शुभेच्छा देऊन प्रोत्साहित केले.

याप्रसंगी मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. राजेंद्र दाभाडे, श्री. वसंत परदेशी तसेच, इतर पोलीस अधिकारी व अंमलदार हजर होते.






**<u>२) उत्कृष्ट तपास करणारे अधिकारी व अंमलदार यांचा मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग यांचे हस्ते गौरव :—</u>**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय, दक्षिण प्रभाग अंतर्गत येणारे पोलीस ठाणे अंतर्गत दाखल असलेल्या गुन्हयामध्ये तपास करणारे, घरफोडी/वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणणारे_तसेच, आत्महत्या करणाऱ्या ईसमाचे प्राण वाचविणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा दिनांक ०९.१०.२०२६ रोजी, मा. श्री वसंत परदेशी, अपर

पोलीस आयुक्त, दक्षिण प्रभाग, नागपूर शहर यांनी त्यांचे कार्यालयात रिवार्ड, प्रशंसापत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव केला.

पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे दाखल कलम १३७(२) भा.न्या.सं. या गुन्ह्यातील घरून निघून गेलेल्या अल्पवयीन मुलीचा तांत्रिक तपास करून शोध घेवून ती नागपूर येथे तिचे आई—वडीलांकडे येण्यास तयार नसल्याने तिला बालकल्याण समिती परभणी यांचे समक्ष हजर करून समितीच्या आदेशान्वये तिला सखी वन स्टाप सेंन्टर, परभणी येथे दाखल केले. नमुद मुलीचे पालकांना मुलीस सखी वन स्टाप सेंन्टर, परभणी येथे दाखल केल्याबाबत सुचित केले. सदर कार्यवाही करणारे पोलीस ठाणे हुडकेश्वर येथील पोउपनि. प्रविण वाकडे, पोहवा उमेश आवरकर, मपोअं. निकीता गोडबोले यांचा,

तसेच, पोलीस ठाणे पारडी येथे कार्यरत पोलीस अंमलदार यांनी डायल—११२ कडून प्राप्त सीएसएफ सुचनेवरून, त्वरीत घटनास्थळी जावुन, बुध्दीचातुर्याचा वापर करून, त्वरीत घटनास्थळी पोहोचून, घराचे दार तोडून, आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या ईसमाचे प्राण वाचविले. त्यास आत्महत्या करण्यापासुन परावृत्त करणारे पोअं. गणेश श्रीरामे, निलेश लंगडे व नितीन कनोजिया यांचा,

पोलीस ठाणे यशोधरानगर येथे दाखल घरफोडीचे गुन्ह्यातील निष्पन्न आरोपीस, मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून ताब्यात घेवून त्याचेकडून ०४ गुन्हे उघडकीस आणले. नमुद आरोपी हा पोलीस ठाणे शांतीनगर व हुडकेश्वर येथील गुन्ह्यांमध्ये पाहिजे आरोपी असल्याचे दिसून आले. आरोपीकडून चोरीची ०३ दुचाकी वाहने व ईतर असा एकुण २,३९,५००/—रू. चा मुद्देमाल जप्त करणारे वपोनि. युनुस चॉद शेख, पोउपनि. निलकंठ नन्नावरे, पोहवा. गणेश गुप्ता, रवि अहिर, पोअं. अमोल भेंडेकर, लक्ष्मण पडवाल, रितेश दुधे, अक्षय कुळसंगे, अमोल आप्तुलकर यांचा,

वरील सर्व उत्कृष्ठ कामगिरी बजावणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना बक्षीसे व प्रमाणपत्रे देवुन त्यांचा सत्कार करून, त्यांनी भविष्यात अशाच प्रकारे उत्कृष्ठ कामगिरी करण्यासाठी शुभेच्छा देवुन प्रोत्साहीत केले.




**<u>(कामगिरी)</u>**

**<u>१) परिमंडळ क्र. ६ अंतर्गत कुख्यात गुंड हद्दपार :—</u>**

परिमंडळ क्र. ६ अंतर्गत पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत **म्हॉडा क्वॉर्टर क्र. १०७, बिल्डींग क्र. ०७, नारी रोड, नागपूर येथे राहणारा व दारुविक्री करणारा गुन्हेगार इसम नामे अमन निशांत इंदुरकर वय २६ वर्षे** याचेविरूध्द पोलीस ठाणे कपिलनगर येथे लोकांना दमदाटी व मारपीट करणे, अवैधरित्या दारु विक्रीकरीता बाळगणे व विक्री करणे, घातक हत्याराने इच्छापुर्वक दुखापत करणे, शांतता भंग करण्याचे उद्येशाने अपमान करणे असे गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार प्रतिबंधक कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता कपिलनगर पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. श्री रमेश धुमाळ, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०६, नागपुर

शहर यांचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०६, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. १६/२०२६ दिनांक ३०.०९.२०२६ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतील पोलीस ठाणे पारशिवनी, खापा, सावनेर, कळमेश्वर, कन्हान, मौदा आणि कुही हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला आहे. नमुद हद्दपार आदेशाची अंमलबजावणी दिनांक ०८.१०.२०२६ रोजी करण्यात आली आहे. नमुद गुन्हेगार इसम हा पोलीस ठाणे हद्दीत दिसुन आल्यास पोलीस ठाणे कपिलनगर येथे व डायल ११२ वर संपर्क साधावा.

वरील कामगिरी मा. श्री रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. सत्यवीर बंडीवार, सहा. पोलीस आयुक्त (जरीपटका विभाग), वपोनि. सतिश आडे यांचे मार्गदर्शनाखाली कपिलनगर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**<u>२) सदर पोलीसांची कामगिरीः— मकोकाचे गुन्हयातील पाहिजे आरोपीस अटक.</u>**

दिनांक २०.०६.२०२६ रोजी १२.०० वा. चे सुमारास, फिर्यादी लक्की नरेश दासर वय २४ वर्ष रा. सुदर्शन दुर्गा माता मंदीरजवळ, गड्डीगोदाम नागपूर हे त्यांचे शेजारी राहणारा ०२ वर्षीय वालक यास ॲक्टिवा गाडीवर असवुन फिरवीत असतांना, आरोपी सलीम खान याचे गाडीचा धक्का फिर्यादीचे गाडीस लागुन फिर्यादी व गाडीवरील बालक खाली पडत असतांना, फिर्यादीने गाडी बराबर चला असे म्हटल्याने फिर्यादी व आरोपीमध्ये शाब्दीक वाद झाला. नंतर फिर्यादी व त्याचे मित्र आरोपीस समजावण्याकरीता गेले असता, आरोपी १) शकील खान अब्दुल गफार खान वय ४० वर्ष रा. गोवा कॉलनी, सदर, २) सुजल जोसेफ पॉल वय २६ वर्ष रा. गोवा कॉलनी, सदर ३) साजीद शेख बासीत शेख वय २६ वर्ष ४) सलीम खान अब्दुल गफार खान वय अंदाजे ४० वर्ष व ५) राजा खान अब्दुल गफार खान वय ३० वर्ष यांनी संगनमत करुन गैरकायद्याची मंडळी जमवुन फिर्यादीस हातबुक्कीने मारहाण करुन फिर्यादीचा मित्र राहुल उर्फ सोनु काशिनाथ डकाहा वय ३४ वर्ष रा. दुर्गा माता मंदीर जवळ, सदर यास जिवानिशी ठार मारण्याचे उद्येशाने हातबुक्कीने, लाकडी दांडा व चाकुने मारुन जखमी केले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सदर येथे आरोपींविरूध्द कलम १०९,१८९(२), १८९(४),२९६,११५(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्यातील पाचही आरोपी हे टोळीचे सदस्य असुन ते कोणताही समाजमान्य कामधंदा न करता, त्यांनी नागपुर शहरात अनेक ठिकाणी जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, अवैध हत्यार बाळगणे, मारहाण करणे, अश्लील शिवीगाळ करणे, विनयभंग करणे असे शरीराविरूध्द अनेक गुन्हे केल्याचे तसेच, अवैध दारु बाळगून विक्री करणे अशा स्वरुपाचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले आहे. आरोपी हे अत्यंत निर्ढावलेले असल्याने त्यांचे कृत्याने सामान्य नागरिकांचे मनात जिवीत व मालमत्तेविषयी असुरक्षिततेची भावना व भिती निर्माण झाल्याने त्यामुळे आरोपींविरूध्द महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायदा अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा. वरिष्ठांचे आदेशाने गुन्ह्यामध्ये कलम ३(१)(ii),३(२),३(४) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा— १९९९ (मकोका) अन्वये कलमवाढ करण्यात आली होती. गुन्ह्याचा पुढील तपास मा. सहायक पोलीस आयुक्त, सदर विभाग करीत होते. नमुद गुन्हयातील आरोपी क्र. ४) सलीम खान अब्दुल गफार खान वय अंदाजे ४० वर्ष हा गुन्हा

घडल्यापासुन आजपावेतो मिळुन आला नव्हता. गुन्हयाचे तपासादरम्यान आरोपीचा कसोशीने शोध घेऊन, तांत्रिक तपास करुन तसेच मिळालेल्या गुप्त बातमीवरुन दिनांक ०९.१०.२०२६ रोजी पाहिजे आरोपी सलीम खान अब्दुल गफार खान वय ४६ वर्ष रा. गोवा कॉलनी, संतोषी माता मंदीरजवळ, सदर नागपुर यास ताब्यात घेऊन अटक करण्यात आली.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. २), मा. शिवाजी गायकवाड, सपोआ. (सदर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. ज्ञानेश्वर भेदोडकर, सपोनि. नरेंद्र तायडे, पोउपनि. जगन्नाथ शेरकर, निकेतन किल्लेदार, पोहवा. प्रकाश बाळबुधे, निलेश लोंढे, प्रेम ढोके, पोअ. अश्वीन भांगे, प्रशांत गायधने यांनी केली.



**३) <u>बेलतरोडी पोलीसांची कामगिरी :– गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता वाहतुक करणाऱ्या आरोपींना अटक.</u>**

दिनांक ०९.१०.२०२६ चे ०२.१५ वा. ते ०२.३० वा. चे दरम्यान, बेलतरोडी पोलीसांना मिळालेल्या माहितीवरुन, त्यांनी पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत जबलपुर हायवेवरील पांजरी टोल नाक्याजवळ आयशर कंपनीचा ट्रक क्र. एमएच ४० सीडी ४३७६ ला थांबवुन पंचासमक्ष पाहणी केली असता, त्यामध्ये लहान मोठी २३ गोवंशीय जनावरांना कोंबुन, दाटीवाटीनपे बांधून त्यांची वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. नमुद वाहनाचे चालकास त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव १) विवेकसिंग अशोकसिंग वय ४२ वर्ष रा. रुनकता गाव, ता. किरावली पोलीस ठाणे सिकंदार जि. आगरा, उत्तरप्रदेश तसेच त्याचे इतर दोन साथीदार यांनी २) मोहम्मद शोयेब अन्सारी वय ३८ वर्ष रा. पार्वती नगर, आदर्श शाळेजवळ, कळमणा ३) शेख समद शेख जमील वय ४८ वर्ष रा. नवीन वस्ती टेका, मक्का मस्जिदजवळ, पाचपावली, नागपूर असे सांगितले. त्यांना नमुद जनावरांबाबत विचारपुस केली असता, त्यांनी कोणतीही कागदपत्रे सादर न केल्याने, नमुद जनावरांना कत्तलीकरीता वाहतुक करीत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे ताब्यातुन एकुण २३ गोवंशीय जनावरे व आयशर ट्रक असा एकुण किंमती अंदाजे १४,६०,०००/–रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. गोवंशीय जनावरे यांना गौरक्षण केंद्र, धंतोली, नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे. फिर्यादी शिवम राजेश लुथरा वय २९ वर्ष रा. प्लॉट क्र. २५०, समता नगर, कपीलनगर, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे बेलतरोडी येथे आरोपीविरूध्द कलम ३२५,३(५) भान्यासं. सहकलम ५(अ),(ब),९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम–१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(१)(अ)(ड)(ई)(ह) प्राणी क्रुरता अधिनियम–१९६० सहकलम ११९ मपोका अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग), वपोनि. रविंद्र नाईकवाड यांचे मार्गदर्शनाखाली त्यांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे वाडी :— हद्दपार आरोपीस अटक.**

दिनांक ०८.१०.२०२६ चे २०.०० वा. चे सुमारास, वाडी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, शुभम ससाणे नावाचा हद्दपार इसम हा आठवा मैल, देशी दारु दुकानाजवळ आलेला आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, नमुद ठिकाणी पाहणी केली असता, तेथे प्राप्त वर्णनाचा इसम संशयीतरित्या वावरतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शुभम कैलास ससाणे वय २८ वर्षे रा. घर क्र. ५५१, पालकर नगर, आठवा मैल, दवलामेटी, अमरावती रोड, वाडी, नागपूर असे सांगीतले. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास मा. पोलीस उपायुक्त, परि.क्र. १, नागपूर शहर यांचे हद्दपार आदेश क्र. ३७३८/२०२४ तामिल दिनांक १२.११.२०२४ नुसार नागपूर शहर व ग्रामिण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले.

आरोपी हा हद्दपार असतांना, कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने परिसरात संशयीतरित्या वावरतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोउपनि सतिश मेश्राम यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे हिंगणा. :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०८.१०.२०२६ चे ०९.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचा मित्र नामे उमाशंकर सुरजसिंग यादव वय ४८ वर्ष हे त्यांचे कंपनीची दुचाकी बजाज प्लटीना क्र. युपी १६ बीझेड ५७६४ ने बुटीबोरी येथे कामानिमीत्त जात असतांना, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत नागपूर—वर्धा रोड वरील नयारा पेट्रोल पंपाच्या आधी पुलावर चारचाकी आयशर गाडी क्र. एचआर ५५ बीए ९३१७ चा चालक आरोपी याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मित्राचे मोटरसायकलला धडक देवुन घटनास्थळावरुन पळुन गेला. अपघातामध्ये फिर्यादीचे मित्र खाली पडुन गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता एम्स हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी कुमार उत्कर्ष वर्धनसिंग वय ३२ वर्षे, रा. ग्राम चांदपुर पोस्ट सरायभोगी जि. जौनुपर, उत्तरप्रदेश ह.मु. प्रितम कॉम्प्लेक्स, प्लॉट क्र. ३०७, टेकानाका, नारी रोड, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे पोउपनि आर.एन.धाकडे ७९७२५७८९१५ यांनी आयशर वाहन चालक आरोपीविरूध्द कलम २८१,१०६(१) भा.न्या.सं., सहकलम १३४,१७७,१८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे सिताबर्डी :— चोरी करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी मनिष शिवभुषण सहगल वय ४९ वर्ष रा. ४०२, सरोदे टॉवर, क्लार्क टाऊन, खरबी चौक, नागपूर यांची पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत तेलीपुरा येथे शनि मंदीरजवळ सहगल इलेक्ट्रॉनिक्स नावाचे दुकान आहे. नमुद दुकान हे फिर्यादीचे वडील नामे शिवभुषण सहगल हे पाहतात. दुकानात आरोपी क्र. १) एकता लिल्हारे २) प्रज्वल मोरे व ३) अजय पद्माकर हे काम करतात. तसेच आरोपी क्र. ३ हा सीसीटिव्ही कॅमेरा दुरूस्तीचे काम बघतो. मागील दोन वर्षात फिर्यादीचे आजारपणाचा फायदा घेऊन, आरोपी क्र. १ ते ३ यांनी

संगनमत करुन, दुकानातील इलेक्ट्रॉनिक वस्तुंची विक्री करुन, विक्रीचे पैसे दुकानाचे गल्ल्यामध्ये न ठेवता, स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता वापरात आणले. तसेच दुकानाचे चेकबुक मधील काही चेकवर खोटया सहया करुन बॅकेंमधुन सुध्दा पैसे काढले. माहे एप्रिल २०२४ ते दिनांक ०८.१०.२०२६ रोजी पावेतो, तिन्ही आरोपीतांनी संगनमताने फिर्यादीचे दुकानातील वस्तुंच्या विक्रीचे तसेच चेकबुकद्वारे एकुण ३ लाख रुपयांचा मुद्येमाल चोरी करुन अपहार केला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि. कोमल उबाले ९९७०८५३९४५ यांनी आरोपींविरूध्द कलम ३०६,३१६(२),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे नंदनवन</u> :—** फिर्यादी शुभम मनोज निमजे वय २९ वर्षे, रा. प्लॉट क्र. २२४४/१५२, शेषनगर, भवन्स स्कुलजवळ, नंदनवन, नागपूर यांनी पोलीस ठाणे नंदनवन येथे तक्रार दिली की, त्यांचा लहान भाऊ नामे सुशिल मनोज निमजे वय २१ वर्ष हे दिनांक ०३.१०.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरून बेपत्ता झाले आहेत. शोध घेतला असता, मिळून आले नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, डोळे—काळे, केस—काळे व कुरळे, अंगात—फिक्कट गुलाबी शिर्ट व निळा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात. ओळख—दोन्ही हाताचे बोटांवर टॅटु गोंदलेला आहे. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे नंदनवन येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**<u>२) पोलीस ठाणे नंदनवन</u> :—** फिर्यादी अजिज शेख बादुला शेख वय ४५ वर्षे, रा. हसनबाग, मोठया मस्जिदसमोर, नंदनवन नागपूर यांनी पोलीस ठाणे नंदनवन येथे तक्रार दिली की, त्यांची मुलगी नामे महक शेख वय २० वर्षे ही दिनांक २७.०९.२०२६ रोजी पासुन राहते घरून बेपत्ता आहे. शोध घेतला असता, मिळून आली नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, केस—काळे लांब, डोळे—काळे, अंगात—पांढरा फ्रॉक व जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा—हिंदी बोलते. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे नंदनवन येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



सुशिल



महक

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. मुख्य न्याय— | ३०२६३/ | कलम | गणपत रामाजी उईके रा. पॅन्थर | १६.१०.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दंडाधिकारी, नागपूर | २००९ | ३९२,३४ भा.दं.वि. | नगर झोपडपट्टी, नाल्याजवळ,, नागपूर | |
| २ | मा. १२ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०२०२५/ २००९ | कलम ८२ सीआरपीसी | विशाल महादेवराव राऊत वय २५ वर्ष रा. जुनी शुक्रवारी, हनुमान मंदीरजवळ, कोतवाली, नागपूर | १५.१०.२०२६ |
| ३ | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्र. ४, नागपूर | ३२४१६४४ /२००३ | कलम ३९३, ३४ भादंवि | अशोक जयरामसिंग यादव रा. अमरदिप टॉकीज मागे, सतरंजीपुरा, सिताबर्डी, नागपूर | १५.१०.२०२६ |

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

**''गुन्हयांतील जप्त वाहनांचे जाहीर लिलाव'' बाबत सुचना :—**

मोटार अपघात दावा प्राधिकरण, नागपुर येथे कार्यरत लिपीक दिगंबर भोलानाथ डेरे यांनी मोठया प्रमाणावर आर्थिक अपहार करून खालील नमूद वाहने खरेदी केल्याने त्यांचेविरूध्द पो.ठाणे सदर येथे अनेक गुन्हे दाखल झालेले आहेत. त्यापैकी अप क्रं.६६९/२०२३ कलम ४०९, ४११, ४१३, ४१८, ४२०, ४६८, ४७१, ४७७(अ), ३८१, १२०(ब), २०१ भादंवि मध्ये नोव्हेंबर २०२३ मध्ये खालील नमूद वाहने जप्त करण्यात आले आहे, मा. जिल्हा व सत्र न्यायाधिश, न्यायालय क्रं. १०,नागपुर शहर यांचे आदेशान्वये आरोपीताकडुन अपहारीत रक्कम वसूल करण्याकरीता जप्त वाहनांची लिलावाव्दारे विक्री करण्यात येणार आहे. सदर वाहनांचा **लिलाव** जसे आहेत, जेथे आहेत, त्या स्थितीत **निविदा** पध्दतीने करण्यात येणार आहे.

सदर वाहने पोलीस मुख्यालय, नागपुर शहर व पोलीस ठाणे सदर चे आवारात ठेवण्यात आले असुन दिनांक ०९.१०.२०२६ ते दिनांक १५.१०.२०२६ पावेतो कार्यालयीन वेळेत सदरची वाहने पहावयास मिळतील.

सदर वाहने लिलाव संबंधी विक्री निविदा फॉर्म, नियम व अटीं, आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस भवन, पाचवा माळा, सिव्हील लाईन, नागपुर येथे कार्यालयीन वेळेत मिळतील. तसेच निविदा फॉर्म मा.पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे अधिकृत वेबसाईट https://nagpurpolice.gov.in/PressRelease.html या वर सुध्दा उपलब्ध आहे. सदर वाहने "**जशी आहेत तशी** " या तत्तावर **लिलावा**व्दारे विकल्या जाणार आहेत.

सदर जाहिर लिलावाचे अटी व नियम दि.०९/१०/२०२६ पासून कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पोलीस कार्यालय, पोलीस भवन, सिव्हील लाईन येथील नोटीस बोर्ड वर सकाळी ११.०० ते १७.०० वा. पर्यत उपलब्ध राहील तसेच सदर जाहिर लिलावाच्या अटी व नियम संबंधीत महानगरपालिका झोन कार्यालय, मोटार परिवहन विभाग कार्यालय, तहसिल कार्यालय/जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर शहर येथे लिलावासंबंधी माहीती उपलब्ध राहील. सदर निवीदा संबंधाने अधिक माहीती करीता पोलीस निरीक्षक श्री. विवेकानंद राऊत, मो.क्र. ७०२८८०८००७ तसेच सफौ. अनिल त्रिवेदी, मो.क्र.९५४५५६५१५६ यांचेशी संपर्क करू शकता.

सदर वाहनांच्या लिलावा संबंधाने कोणतेही कारण न देता जाहिर लिलाव स्थगित किंवा रद्द करण्याचा किंवा इतर कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार वाहन लिलाव समिती कडे कायम राखुन ठेवण्यात आला आहे.

| अ.क्र | वाहन मालकाचे नांव | मॉडेल व खरेदी वर्ष | नोंदणी क्रमांक व विमा | मुल्यांकन |
|---|---|---|---|---|
| 1 | Gopal Datta Jare | **Ashok Layland Truck 3718 BSIV 19.11.2018** | MH49-AT3084<br>Tata General Insurance<br>18.10.2023 | 9,55,000/- |
| 2 | Ganga Transport | **Bharat Benz Truck 1415R 01.12.2020** | MH49-AT6927<br>Tata AIG General Insu<br>12.11.2023 | 10,35,000/- |
| 3 | Gopal Datta Jare | **Ashok Layland Truck 3718 BSIV 24.08.2018** | MH38- X9190<br>Tata AIG General Insu<br>18.10.2023 | 9,05,000/- |
| 4 | Rajshree Dere | **Bharat Benz Truck 3723R 28.11.2018** | MH49-AT9190<br>Tata AIG General Insu<br>31.10.2023 | 9,35,000/- |
| 5 | Ganga Transport | **Eicher Truck Eicher Pro 5025LHSD 11.03.2019** | MH49-AT3847<br>ICICI Lombard<br>17.02.2023 | 7,05,000/- |
| 6 | Ganga Transport | **Bharat Benz Truck 3723R 28.11.2018** | MH49-AT3686<br>Tata AIG General Insu<br>18.01.2024 | 10,45,000/- |
| 7 | Ganga Transport<br>Rajshree Dere | **Mahindra & Mahindra Truck MTB Blazo25 17.12.2018** | MH49-AT3276<br>Tata AIG General Insu<br>05.12.2023 | 9,05,000/- |
| 8 | Sachin Gandhare | **Maruti XL-6 Car 10.08.2020** | MH31-FR0681<br>Upto 2023 | 6,05,000/- |
| 9 | Gopal Datta Jare | **Splendor+ 135 29.01.2021** | MH49-BP7135<br>Upto Jan -2024 | 32,000/- |
| 10 | Gopal Datta Jare | **Himalayan Royal Enfield 23.06.2022** | MH49-BV3885<br>Upto June -2023 | 85,000/- |
| 11 | Rajshree Dere | **Jawa 42 Bike 28.06.2021** | MH49-BQ5751<br>Upto June-2022 | 82,000/- |
| 12 | Ganga Transport<br>Rajshree Dere | **Bharat Benz Truck 1415R 01.12.2020** | MH49AT6928<br>Tata AIG General Insu<br>12.11.2022 | 10,15,000/- |
| 13 | Ganga Transport<br>Rajshree Dere | **Tata Motors Tata LPT3518 17.03.2020** | MH49AT6428<br>Tata AIG General Insu<br>14.02.2021 | 10,22,000/- |
| 14 | Digamber B. Dere | **Vespa VXL150 30.08.2018** | MH49-BA 4348<br>Upto August - 2022 | 24,000/- |
| | बाजारभाव मुल्य (एकत्रित) | रू. ९३,५०,०००/—<br>अक्षरी त्र्याण्णव लक्ष, पन्नास हजार रूपये फक्त | | |

**महत्वाच्या सुचना :—**

१) **निविदा पाठविण्याचे ठिकाण** :— कार्यालय पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस भवन, पाचवा माळा, सिव्हील लाईन, नागपुर

२) वाहनविक्री निविदा फॉर्म, नियम व अटीं, आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस भवन, पाचवा माळा, सिव्हील लाईन, नागपुर येथे कार्यालयीन वेळेत मिळतील. तसेच सदर निविदा फॉर्म मा.पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे अधिकृत वेबसाईट https://nagpurpolice.gov.in/PressRelease.html या वर उपलब्ध आहे.

३) वाहन अनु क्रं. ०१ ते ०९ हे पोलीस मुख्यालय, नागपुर शहर व क्रं. १० ते १४ हे पोलीस ठाणे सदर येथे ठेवण्यात आले आहे, पोलीस निरीक्षक श्री विवेकानंद राऊत, मोबाइल क्रं. ७०२८८०८००७ अथवा सफौ अनिल त्रिवेदी, मो.क्र. ९५४५५६५१५६ यांचेशी संपर्क साधून **दिनांक ०९.१०.२०२६** पासुन पहावयास मिळतील.

४) वाहन विक्रीमध्ये भाग घेणाऱ्या इच्छुक व्यक्तींनी बंद पाकिटामध्ये विहीत निविदा फॉर्म भरणे आवश्यक आहे, निविदा फॉर्म भरतांना प्रत्येक वाहनाकरीता रजिस्ट्रेशन फी ५०००/— रू. याप्रमाणे अमानत रक्कम भरणे आवश्यक असुन सदरची रक्कम रिफन्डेबल राहील. सदर रक्कमेचा डिमांड ड्राफट व्दारे "**पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, नागपुर शहर**" या नावाने निविदा फॉर्मसोबत दयावायाचा आहे. वाहनासंबंधी निविदा फॉर्म सादर करतांना पाकिटबंद लिफाफावर ठळकपणे वाहन लिलाव निविदा नमूद करावे. **दिनांक १५/११/२०२६ चे १७.०० वा. पर्यत वाहन लिलाव निविदा** सादर करावयाच्या आहेत.

५) निविदा फॉर्मसोबत घेणाऱ्याचा सध्याचा फोटोग्राफ, पॅनकार्ड, आधारकार्ड यासह केवायसी कागदपत्रे छायाकिंत प्रती सेल्फ अटेस्टेड/स्व साक्षांकित करून दयावयाचे आहेत.

६)जाहिर लिलावातील उपरोक्त नमूद वाहनांची एकत्रित बाजारमुल्य रक्कम रू. ९३,५०,०००/— अक्षरी त्र्याणव लक्ष, पंन्नास हजार रूपये फक्त आहे.

७) निविदा उघडण्याचा **दिनांक १७.१०.२०२६ रोजी ११.३० वाजता** अथवा इतर सोयीस्कर दिवशी कार्यालय पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस भवन, पाचवा माळा, सिव्हील लाईन, नागपुर येथे राहील.

८) वाहनांवरील केसेसची, टॅक्स, विमा व इतर आवश्यक सर्व माहिती ही निविदादाराने स्वत: मिळवायची आहे.

९) निविदा मंजूर झाल्यावर संबंधितांना कळविले जाईल, तद्‌नंतर मंजूर निविदा रक्कमेच्या २५ टक्के रक्कम ताबडतोब भरणा करावा लागेल व उर्वरीत रक्कम ५ दिवसाच्या आंत भरणे क्रमप्राप्त आहे. तसे न केल्यास भरलेली संपूर्ण रक्कम ही जप्त केली जाईल. निविदेप्रमाणे पुर्ण रक्कम भरणा केल्यानंतरच वाहनांचा ताबा देण्यात येईल. वाहनाचा ताबा घेतल्यानंतर वाहनाची सर्वस्वी जबाबदारी ही खरेदीदार यांचीच राहील. सदर वाहन खर्चासह हस्तांतरीत करून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी खरेदीदार यांची राहील.

१०) विहीत मुदतीत वाहनांच्या लिलाव निविदा संख्येने प्राप्त न झाल्यास फेरनिविदा मागविण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल.

११) कोणतेही कारण न देता जाहिर लिलाव स्थगीत किंवा रद्द करण्याचा अथवा इतर कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार वाहन लिलाव समिती कडे कायम ठेवण्यात आला आहे.

स्वा/—

**(महक स्वामी) I.P.S.**
**पोलीस उपायुक्त,**
**आर्थिक गुन्हे शाखा, नागपुर शहर**